१. **या भरती प्रक्रियेचे स्वरुप काय आहे, त्याची सखोल माहीती मला कोठे मिळेल ?**

या भरती प्रक्रियेची माहीती आपणास पुढील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

www.oasis.mkcl.org/mahadiscom

www.mahadiscom.in

२. **डोमिसाईल सर्टिफिकेट म्हणजे काय, ते कोठे मिळते ?**

डोमिसाईल सर्टिफिकेट म्हणजे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला ज्यावर आपण महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याची नोंद असते. व ते आपल्याला तहसीलदार कार्यालयाकडुन मिळते.

३. **माझ्याकडे डोमिसाईल सर्टिफिकेट नाही तरी मी अर्ज करु शकतो का ?**

होय, जर आपल्याकडे डोमिसाईल सर्टिफिकेट नसेल तर आपण या पैकी कोणताही एक अथवा अनेक कागदपत्रे रहिवासी पुरावा म्हणुन जोडु शकता – १. शाळा सोडल्याचा दाखला २. जन्म दाखला ३. पासपोर्ट ४. रेशन कार्ड. ५. तलाठ्याचा रहिवासी दाखला

४. **डोमिसाईल सर्टिफिकेट नुतनी करणासाठी दिले आहे तर मी अर्ज करु शकतो का?**

होय, आपण आपल्या जुन्या डोमिसाईल सर्टिफिकेट ची सत्यप्रत व नुतनी करणासाठी दिलेल्याची पोच (टोकन) जोडुन अर्ज करु शकता.

५. **नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट कोणासाठी लागते ?**

नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट हे पुरुष खुला प्रवर्ग, अ.ज. व अ.जा. प्रवर्गा मधील स्त्री / पुरुष उमेदवार सोडुन सर्व प्रवर्गा साठी लागते. तसेच महिला आरक्षणाचा लाभ घ्यायचा असेल तरी देखील ते लागते यात खुल्या प्रवर्गासाठी देखील ते लागु आहे. तसेच जर आपण खेळाडु असाल तरीही आपणास ते लागते.

६. **माझ्याकडे जातीचा दाखला नाही तर मी अर्ज भरु शकतो का ?**

जर आपण खुल्या प्रवर्गातुन अर्ज भरत असाल तर आपणास जातीच्या दाखल्याची आवश्यकता नाही. पण जर आपण खुल्या प्रवर्गात नसाल तर इतर सर्व प्रवर्गा साठी जातीचा दाखला आवश्यक आहे. जर आपण इतर प्रवर्गात असाल आणि जर दाखला नसेल आणि आपले वय जर खुल्या प्रवर्गासाठीच्या वयोमर्यादेत असेल तर आपण खुल्या प्रवर्गात अर्ज भरु शकता.

७. **माझ्याकडे जाती वैधता प्रमाणपत्र नाही तर मी अर्ज भरु शकतो का ?**

होय, जर उमेदवाराकडे जाती वैधता प्रमाणपत्र (अ.जा. सोडुन) नसेल आणि जर उमेदवार निवड प्रक्रियेत आला तर त्या उमेदवाराला नेमणुकीच्या तारखेपासुन ३ महिन्याच्या आत सदर प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे तसेच जर आपण ST प्रवर्गातील असाल व जाती वैधता प्रमाणपत्रा साठी अर्ज केलेला असेल आणि जर आपली निवड झाली तर आपण जाती वैधता प्रमाणपत्र सादर केल्या शिवाय नेमणुक दिली जाणार नाही.

८. **माझे नाव बदलले आहे व माझ्याकडे जुन्या नावाने कागदपत्रे आहेत तर मी नवीन नावाने अर्ज भरु शकतो का ?**

होय, आपण जर नवीन नावाचे गॅझेटची सत्यप्रत अर्जासोबत जोडली असेल तर आपण अर्ज भरु शकता.

९. **माझे वय २१/१२/२००९ ला कमाल वयोमर्यादे पेक्षा १ दिवस जास्त आहे तर मी अर्ज भरु शकतो का ?**

नाही

**१०.मी माजी सैनिक आहे, माझ्याकडे सर्व्हीस बुक आहे, डिस्चार्ज सर्टिफिकेट आहे तर मी माजी सैनिक या इतर आरक्षणासाठी अर्ज करु शकतो का व मला वयाची सुट मिळु शकते का ?**

जर आपल्या कडे जिल्हा सैनिक बोर्डाकडील वैधता असलेल्या नोंदणीचा पुरावा असेल व तो आपण वर नमुद केलेल्या कागदपत्रा सहीत अर्जा सोबत जोडत असाल तर आपण या करता पात्र आहात अन्यथा नाही.

**११.मी अर्ज पुण्यात भरणार आहे तर परीक्षेचे Call Letter मला इथे मिळेल का ?**

नाही, आपण जिथे अर्ज दाखल करता तेथेच आपणाला Call Letter मिळेल.

**१२.अर्जावरील फोटो वर अटेस्टेशन करायचे आहे का ?**

नाही.

**१३.सत्यप्रती साठी कोणाचे अटेस्टेशन लागते.**

१. विषेश कार्यकारी दंडाधिकारी २. कॉलेजचे प्राचार्य ३. राष्ट्रीयकृत बँकेचे मॅनेजर ४. विद्यापीठाचे विभाग प्रमुख ५. राजपात्रित आधिकारी ६. नोटरी ७. वकील

**१४.माझ्याकडे एक अथवा अनेक कागदपत्रे कमी आहेत मी उद्या किंवा संध्याकाळी देतो अर्ज जमा करुन घ्याल का ?**

नाही.

**१५.मी एका वेळेस किती अर्ज भरु शकतो?**

आपण एका वेळेस प्रत्येक परीमंडळाकरता व पदासाठी स्वतंत्र अर्ज करु शकता पण आपण कोणत्याही एका परिमंडळाच्याच परिक्षेला बसु शकता. तसेच जर आपण एकाच परिमंडळाच्या दोन पदांकरता अर्ज करत असाल तर आपण दोन्ही पदांच्या परीक्षांना बसु शकता. आपण एका पेक्षा जास्त परीमंडळांकरता अर्ज केला असेल तर आपण ज्या परिमंडळाच्या परीक्षेला बसला असाल त्याच पदासाठी आपण ग्राह्य धरला जाईल, व जेथे आपण अनुपस्थित असाल तिथे आपण अर्ज भरला असाल तरीही आपला दावा सांगता येणार नाही.

**१६.माझ्या कडे गुणपत्रक नाही पण प्रमाणपत्र आहे तर ते चालु शकते का ?**

जर आपण आपले गुण लेखी लिहुन देऊ शकत असाल तर चालु शकते, अर्ज भरत असताना गुणपत्रकावरील गुण व श्रेणी भरणे बंधनकारक आहे त्या करता गुणपत्रक वा त्या वरील गुण लागतात.

**१७.मी खुल्या प्रवर्गातील नसुन आरक्षित प्रवर्गातील आहे पण मला खुल्या प्रवर्गातुन अर्ज भरायचा आहे तर मी तो भरु शकतो का ?**

जर आपले वय खुल्या प्रवर्गाच्या वयोमर्यादे मध्ये बसत असेल तर आपण अर्ज भरु शकता.

**१८.मी खुल्या प्रवर्गातील असुन माझे वय कमाल वयोमर्यादे पेक्षा जास्त आहे तर मी आरक्षित प्रवर्गातील जागां साठी अर्ज करु शकतो का ?**

नाही.

**१९.मी एका वेळेस दोन्ही पदांना अर्ज करु शकतो का ?**

होय, जर आपण दोन्ही पदांची किमान पात्रता पुर्ण करत असाल तर करु शकता

**२०.माझा अर्ज कागदपत्रांच्या त्रुटी मुळे अथवा त्यांच्या तांत्रिक त्रुटी मुळे अपात्र ठरत असेल तर माझी कागदपत्रे व मी भरलेली फी मला परत मिळु शकते का ?**

होय.

**२१.मी शेवटच्या दिवशी २१/१२/२००९ ला संध्याकाळी ६ वाजता अर्ज दाखल करण्या साठी आलो तर माझा अर्ज स्वीकाराल का ?**

नाही.

**२२.अर्ज स्वीकारण्याकरता कोणाची शिफारस आणली तर स्वीकाराल ?**

नाही

**२३.मी अर्ज दाखल करण्याच्या फीचा चेक / डी. डी. आणला तर अर्ज स्वीकाराल का ?**

नाही, रोख शुल्क हवे

**२४.मी भरलेल्या फीच्या शुल्काची पावती तुम्ही देणार का ?**

होय

**२५.मी दोन्ही पायाने / हातानी अपंग आहे तर मी कोणत्या पदासाठी अर्ज करु शकतो.**

कोणत्याही नाही

- कनिष्ठ यंत्रचालक या पदासाठी अल्पदृष्टी / बहीरेपणा / १ पायाने अपंग / १ हात अपंग उमेदवार पात्र आहेत.
- कनिष्ठ तंत्रज्ञ या पदासाठी अल्पदृष्टी / बहीरेपणा उमेदवार पात्र आहेत.

**२६.माझ्याकडे स्थानिक डॉक्टरांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र आहे तर मी अपंग आरक्षणासाठी अर्ज करु शकतो का ?**

नाही, अपंगांच्या आरक्षणा करता जिल्हा शल्य अधिका-याचा दाखला आवश्यक आहे.

**२७.माझे म.रा.वि.म. / महावितरण मधील शिकाऊ उमेदवारी चालु आहे तर मी १० % आरक्षणासाठी पात्र आहे का ?**

नाही

**२८.प्रशिक्षणार्थींच्या कालावधी इतकी उच्चतम वयोमर्यादेमध्ये सुट कोणास लागु आहे. ?**

तदर्थ मंडळ अथवा महावितरण कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींनाच प्रशिक्षणाच्या कालावधी इतकी उच्चतम वयोमर्यादे मध्ये सुट मिळेल.

**२९.नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट कोणत्या तारखे पासुन कोणत्या तारखे पर्यंत चालते ?**

सदर प्रमाणपत्र दि. ०१-०४-२००९ नंतरचे असावे आणि ते ३१-०३-२०१० वा त्या पुढे वैध असावे.

**३०.जिल्हा रोजगार कार्यालयात माझी नोंदणी नाही तर मी अर्ज करु शकतो का ?**

होय.

**३१.जिल्हा रोजगार कार्यालयात माझी नोंदणी आहे पण त्याच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत आत्ता आणलेली नाही तर मी अर्ज करु शकतो का ?**

होय

**३२.शिकाऊ उमेदवारीच्या १०% आरक्षणासाठी किमान किती महीने शिकाऊ उमेदवारी पुर्ण असली पाहीजे**

किमान १२ महीने किंवा त्या पेक्षा जास्त.

**३३.मी अर्ज पोस्टाने पाठवु शकतो काय ?**

नाही.

**३४.परीक्षेचे स्वरुप काय असेल, परीक्षा कशी असते, त्याचा सिलॅबस काय आहे ?**

सर्व माहीती नंतर उपलब्ध करण्यात येईल

**३५.जुन्या परीक्षांचे पेपर मिळतील का?**

नाही.

**३६.परीक्षा कधी आहे ? कुठे आहे ?**

परीक्षा २४ जानेवारी २०१० ला परीमंडलातंर्गत जिल्ह्याच्या ठिकाणी घेणार आहे पण ठिकाण ४ जानेवारी नंतर कळणार आहे.

**३७.परीक्षेचा निकाल कधी आहे ?**

लेखी टेक्निकल कॉम्पेटेन्सी टेस्ट मधील गुणवत्तेच्या प्रमाणे उमेदवारांची संक्षिप्त यादी कंपनीच्या संकेत स्थळावर, कंपनीच्या परीमंडल कार्यालयामध्ये त्याचप्रमाणे MKCL च्या ALC केंद्रावर माहे फेब्रुवारी / मार्च २०१० मध्ये उपलब्ध करुण देण्यात येईल.

**३८.सर्व पदांची परीक्षा एकाच वेळी होणार काय ?**

होय दोन सत्रात.

**३९.परीक्षेचे Call Letter मला घरी पोच होणार काय ?**

नाही, जेथे अर्ज भरला आहे तेथुनच ०४/०१/२०१० नंतर मिळेल. व त्या साठी आपणास चौकशी करावी लागेल

**४०.परीक्षेचे वेळापत्रक, तारीख व ठिकाण तुम्ही मला फोन करुन सांगणार काय ?**

नाही.

**४१.मी तुम्हाला को-या अर्जाची किंमत १०/- व अर्ज दाखल करण्याची फी सोडुन अजुन किती पैसे द्यावे लागतील ?**

काही नाही.

**४२.मला तुमच्या केंद्रावर अर्ज भरल्यावर त्यात काही त्रुटी आढळल्यास व त्या तुम्ही करुन देऊ शकत नसाल तर मला कोणाला भेटावे लागेल व कोठे भेटावे लागेल ?**

या साठी आपण जेथे अर्ज भरला आहे त्या ALC ला LLC शी संपर्क साधुन आपली समस्या त्याच केंद्रावर निरसन करुन मिळेल त्या करीता आपणास कोठेही जावे लागणार नाही, व ती शंका / समस्या निरसन करण्याची जबाबदारी ही ज्या त्या ALC ची राहील.

**४३.कागदपत्रे सत्यप्रतीत नसतील अथवा एखादी सत्य प्रत नसेल तर चालेल का ?**

नाही, कारण आपण कोणतेही मुळ कागद स्वीकारणार नाही त्या मुळे सर्व कागद हे सत्य प्रतीत हवेतच

**४४.अर्ज मराठीत भरला तर चालेल काय ?**

नाही. इंग्रजी मध्येच भरावा लागेल.

**४५.मी अर्ज भरल्यावर त्याची पोच म्हणुन तुम्ही मला काय देणार आहात ?**

समरी शीट व पैसे भरल्याची पावती देणार आहे.

**४६.लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र कोणी भरायचे असते ?**

विवाहीत उमेदवारांना हे प्रमाणपत्र भरावे लागते.

**४७.मी अर्जावर एक किंवा अधिक ठिकाणी सही करायची राहीली आहे तर चालेल का ?**

नाही, अपुर्ण अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**४८.माझे ITI झाले नाही पण व्होकेशनल बोर्डाचे MCVC झाले आहे तर मी अर्ज भरु शकतो का ?**

नाही

**४९.माझे Diploma / B.E. / M.E. In Electrical Engg. झालेय तर मी अर्ज भरु शकतो काय ?**

होय

**५०.माझे Diploma / B.E. / M.E. In Electronics Engg. झालेय तर मी अर्ज भरु शकतो काय ?**

नाही.

**५१.मी Contract Basis वर महावितरण / म.रा.वि.म मधे काम करतोय तर माझा अनुभव शिकाउ उमेदवारी साठी ग्राह्य धरला जाउ शकतो का ?**

नाही.

**५२.शिकाऊ उमेदवारी म्हणजे काय ?**

आपले I.T.I. शिक्षण पुर्ण झाल्यावर आपण जी Apperentisship करता त्याला शिकाऊ उमेदवारी म्हणतात.

**५३.माजी सैनिक म्हणुन ४५वर्षे पेक्षा जास्त वयाचा उमेदवार अर्ज करु शकतो काय?**

नाही

**५४.माझे MS-CIT झाले नाही पण माझा इतरत्र संगणक कोर्स पुर्ण झाला आहे तर तो मी नमुद करु शकतो का ?**

होय, जर शासनमान्य संस्थेचा कोर्स असेल तर करु शकता

**५५.माझी शिकाऊ उमेदवारी म.रा.वि.म. / महावितरण मधे झाली नसुन इतर संस्थेत झाली आहे तर ती ग्राह्य धरणार का ? व मला १० % आरक्षणाचा लाभ मिळणार काय ?**

नाही.

**५६.मी महिला उमेदवार आहे व मला अर्ज करायचा आहे तर मला नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट अर्जा सोबत जोडणे बंधनकारक आहे का ?**

जर आपण महिला आरक्षणा करिता अर्जात नमुद केले असेल तरच आपल्याला सदर प्रमाणपत्र लागेल अन्यथा नाही.

**५७.शिकाऊ उमेदवारांसाठी असलेल्या १० % आरक्षणा करता कोण कोण पात्र आहेत.**

ज्यांचे शिकाऊ उमेदवारी म.रा.वि.म. अथवा महावितरण मधे झाली असेल तरच आपणास हा लाभ मिळु शकतो.

**५८.शाळा सोडल्याचा दाखला प्रत्येक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे का ?**

नाही, जर आपण रहिवासी दाखला म्हणुन शाळा सोडल्याचा दाखला जोडत असाल तरच आवश्यक आहे.

**५९.NCTVT चे सर्टिफिकेट प्रत्येक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे काय ?**

नाही, जर आपण अर्जात NCTVT (राष्ट्रीय शिक्षण परीषद) चा उल्लेख केला असेल तरच आपल्याला सदर प्रमाणपत्र जोडावे लागेल. जर आपल्याला NCTVT चे प्रमाणपत्र मिळाले नसेल तर आपण NCTVT प्रोव्हीजनल सर्टिफिकेट जोडावे.

**६०.सेवा प्रमाणपत्र अथवा ओळखपत्र केव्हा लागते?**

जर आपण महावितरण चे कर्मचारी असाल व आपण त्या करता तसेच वयोमर्यादा शिथिलीकरणा करता करत असाल तर आपणास ते अर्जासोबत सत्यप्रतीत जोडावे लागेल.

**६१.अनुभवाचा दाखला प्रत्येक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे काय ?**

जर आपण कामाचा अनुभव नमुद करत असाल तर आवश्यक आहे.

**६२.मी प्रकल्पग्रस्त आहे व मी विवाहीत महिला आहे व माझ्याकडे वडिलांचे प्रकल्पग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र आहे तर ते चालेल का ?**

होय, त्यात आपल्या नावाचा उल्लेख असावा लागेल व आपल्याला त्याच नावाने अर्ज भरावा लागेल.

**६३.प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र तलाठ्याचे आहे तर ते चालेल काय ?**

नाही. महसुल कार्यालयाने जारी केलेले लागेल.

**६४.MS-CIT चे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे काय ?**

जर आपण अर्जा मध्ये MS-CIT चा उल्लेख केला असेल तर ते आपणास जोडणे आवश्यक आहे.